

खासदार निधीतून विविध विकासकामांचे उद्घाटन,भूमिपूजन

e Paper

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

वर्ष 3रे

www.metrocityvrutant.in

शनिवार दिनांक 25/01/२०२५

METRO CITY VRUTANT

पिंपरी चिंचवड व पुणे ‖ पान 4 ‖ अंक 29 ‖ RNI - MAHMAR/2021/51259 ‖ metrocity924@gmail.com


# उद्धव ठाकरेंनी दिले देवेंद्र फडणवीसांसोबत मैत्रीचे संकेत?

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत



मुंबई : शिवसेनाप्रमुख दिवंगत बाळासाहेब ठाकरे यांच्या जयंतीनिमित्त मुंबईच्या अंधेरी येथील क्रीडा संकुलात गुरुवारी (२३ जानेवारी) शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचा मेळावा पार पडला. या मेळाव्यात बोलताना उद्धव ठाकरे यांनी केंद्रीय गृहमंत्री व भारतीय जनता पार्टीचे वरिष्ठ नेते अमित शाह यांच्यावर जोरदार हल्लाबोल केला. मात्र यावेळी उद्धव ठाकरे यांनी त्यांचे विरोधक आणि राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर टीका केली नाही. यावरून फडणवीस व उद्धव ठाकरे यांच्यातील नव्या मैत्रीचे संकेत दिसत आहेत का असा प्रश्न काही लोकांना पडला आहे.

या मेळाव्यात बोलताना उद्धव ठाकरे यांनी मुंबई महापालिकेसह स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीबाबत स्वबळाचे संकेत दिले. यावर शरद पवार यांनी प्रतिक्रिया दिली आहे. ते म्हणाले, “दोन दिवसांपूर्वी उद्धव ठाकरे माझ्याकडे आले होते. आमच्यात या विषयासह इतर काही विषयांवर सविस्तर चर्चा झाली. त्यानंतर त्यांनी काल त्यावर भाष्य केलं. ते त्यांचं मत आहे. मात्र, त्यासाठी ते एकदम टोकाची भूमिका घेतील असं मला वाटत नाही”.

**उद्धव ठाकर सातत्याने शाह व फडणवीस यांच्या विरोधात बोलतात - शरद पवार**

यावर शरद पवार म्हणाले, “मला नाही वाटत की यात काही संकेत असतील.

उद्धव ठाकरे हे सातत्याने शाह व फडणवीस यांच्याबद्दल बोलत आहेत.

ते नेहमीच बोलतात. महाराष्ट्राच्या जनतेने सातत्याने याची नोंद घेतली आहे. विरोधी पक्षांमधील नेतृत्वाने देखील याची नोंद घेतली आहे. दुसऱ्या बाजूला अमित शाह यांच्या बोलण्याचा स्वर अगदी टोकाचा राहिला आहे.

त्याला उद्धव ठाकरे यांनी प्रत्युत्तर दिलं.

देशाचे गृहमंत्री काहीतरी तारतम्य ठेवून भाष्य करतील अशी अपेक्षा असते.

मात्र अमित शाह तसा प्रयत्न करताना दिसत नाहीत.

ते कोल्हापुरात अनेक वर्षे राहिले आहेत. मात्र त्यांच्यावर कोल्हापूरचे संस्कार आहेत असं वाटत नाही. ते खरंच कोल्हापुरात शिकले की आणखी कुठे शिकलेत त्याबद्दल काही सांगता येत नाही.

# राज्यातील 73 हजार विद्यार्थ्यांना 70 कोटींची शिष्यवृत्ती

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत




मुंबई : राज्यातील मराठा, कुणबी, कुणबी मराठा, मराठा कुणबी ७३ हजार विद्यार्थ्यांना तब्बल ७० कोटी ८ लाख रुपयांच्या छत्रपती राजाराम महाराज सारथी शिष्यवृत्तीचे वितरण सुरू करण्यात आले आहे.

योजना सुरू झाल्यापासूनची शिष्यवृत्तीची आणि लाभार्थ्यांचीही सर्वाधिक रक्कम व संख्या आहे.


केंद्र सरकारच्या राष्ट्रीय आर्थिक दुर्बल घटक विद्यार्थ्यांसाठी एन.एम.एम.एस. म्हणजेच शिष्यवृत्ती योजना परीक्षा घेण्यात येते. याच धर्तीवर महाराष्ट्र शासनाच्या ‘सारथी’कडून ही शिष्यवृत्ती सुरू करण्यात आली आहे. एन.एम.एम.एस.ची शिष्यवृत्ती निवडक गुणवंतांनाच मिळते. परंतु, ही परीक्षा उत्तीर्ण होणारे गुणवत्तापूर्णच असतात. त्यांना पाठबळ देण्यासाठी ही शिष्यवृत्ती सुरू करण्यात आली आहे.

यामध्ये ९वी ते १२वीपर्यंत नियमित शिक्षण घेणाऱ्या अनुदानित विद्यालयातील व कनिष्ठ महाविद्यालयातील शिक्षण घेत असलेल्या तसेच केंद्र शासनाची शिष्यवृत्ती अप्राप्त असणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रतिवर्षी ९ हजार ६०० रुपये असे चार वर्षांत एकूण ३८ हजार रुपये देण्यात येतात.

सन २०२४/२५ या वर्षामध्ये आतापर्यंत या शिष्यवृत्तीसाठी राज्यातून ९वी ते १२वीच्या ७३ हजार विद्यार्थ्यांनी अर्ज केले आहेत.

यातील अर्ज मंजुरीची प्रक्रिया अंतिम टप्प्यात असून या सर्वांना ७० कोटी ८ लाख रुपये वितरित करण्यात येणार आहेत.

त्यातील ठाणे, सिंधुदुर्ग, रत्नागिरी, रायगड, पालघर, अमरावती, वर्धा, नाशिक, चंद्रपूर व नांदेड या दहा जिल्ह्यांतील विद्यार्थ्यांना आतापर्यंत २ कोटी ६४ लाख रुपयांच्या शिष्यवृत्तीचे वितरणही करण्यात आले आहे. उर्वरित जिल्ह्यातील वितरण लवकरच करण्यात येणार आहे.



# खासदार निधीतून विविध विकासकामांचे उद्घाटन,भूमिपूजन

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**मावळ - खासदार श्रीरंग बारणे यांच्या स्थानिक खासदार निधीतून मावळमधील काले कॉलनी, पवनानगर, ग्रुप ग्रामपंचायत कांब्रेत विविध विकासकामांचे उद्‌घाटन, भूमिपूजन करण्यात आले. खासदार बारणे यांच्या हस्ते कामाचा शुभारंभ, भूमिपूजन गुरुवारी करण्यात आले. खासदार बारणे यांच्या तिसऱ्या टर्ममध्ये मावळात पुन्हा विकास कामांचा धडाका सुरू झाला आहे.खासदार श्रीरंग बारणे यांचे मावळ तालुक्यावर विशेष लक्ष आहे.**



मावळ तालुका वाड्या-वस्त्यांमध्ये विस्तारला आहे. त्यामुळे अनेक गावांमध्ये दळणवळणासाठी रस्त्यांचा अभाव होता. अंतर्गत रस्ते नव्हते. त्याकरिता खासदार बारणे यांनी मागील दोन टर्ममध्ये खासदार निधी आणि जिल्हा वार्षिक निधीतून मावळ तालुक्यातील अंतर्गत रस्ते करण्यावर भर दिला आहे. सिमेंट कॉंक्रीटचे रस्ते केले. समाज मंदिरे, पाणी टाक्यासाठी मोठ्या प्रमाणात निधी उपलब्ध करून दिला आहे. मावळातील अनेक गावात अंतर्गत रस्ते झाले आहेत. त्यामुळे मावळातील नागरिकांना खासदार बारणे यांच्यावर विश्वास टाकत तिसऱ्यावेळी मोठ्या मताधिक्याने निवडून दिले.आता पुन्हा खासदार बारणे यांनी विकास कामांचा धडाका सुरू केला आहे. स्थानिक खासदार निधीतून विकास कामे सुरू केली आहेत. मावळ दौऱ्यावर असताना ग्रुप ग्रामपंचायत कांब्रेसाठी दिलेल्या 50 लाखाच्या कामाचा शुभारंभ केला. त्यात सिमेंट कॉंक्रीटचे अंतर्गत रस्ते, समाज मंदिराच्या कामाचा समावेश आहे. त्याचबरोबर पवनानगर येथील पवना विद्या मंदिराकडे जाण्यासाठी स्थानिक खासदार निधीतून 12 लाख रुपये खर्च करून रस्ता विकसित केला होता. या रस्त्याचे लोकार्पण खासदार बारणे यांच्या हस्ते करण्यात आले.खासदार श्रीरंग बारणे म्हणाले, विकासाच्या दृष्टीकोणातून सर्वाधिक निधी मावळला दिला आहे. मावळात गावे विस्तारली आहेत. प्रत्येक गावात जाण्यासाठी तसेच अंतर्गत रस्ते करण्यावर भर दिला. त्याची पोहोचपावती जनतेने दिली. तिसऱ्यांदा मला सेवा करण्याची संधी दिली. राज्यात पुन्हा चांगल्या विचारांचे महायुतीचे सरकार आले आहे. त्यामुळे निधीची कमतरता भासणार नाही. भरघोस निधी मिळत आहे. केंद्र सरकार, राज्य सरकारच्या निधीतून मावळात मोठी विकास कामे केली. यापुढेही विकास कामे सुरूच राहतील.

# पिंपरी चिंचवड विद्यापीठात जीवनदायिनी रक्तदान शिबिराचे आयोजन

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत



पिंपरी, पुणे पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्टच्या साते, वडगांव मावळ येथील पिंपरी चिंचवड विद्यापीठ मधील येथे जीवनदायिनी रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. त्याचे उद्घाटन कुलगुरू डॉ. मनीमाला पुरी यांच्या हस्ते करण्यात आले. यासाठी विद्यापीठाच्या फार्मा व्हिजनरी क्लब आणि स्कूल ऑफ मॅनेजमेंट व रेड प्लस ब्लड बँकेचे सहकार्य लाभले. विद्यार्थी आकाश कुंभार आणि श्रेया वरुटे यांच्यासह १९२ दात्यांनी रक्तदान केले. आयोजनात स्कूल ऑफ मॅनेजमेंटचे प्रमुख डॉ. अमित पाटील आणि सह. प्रा. प्रथा सांबरे यांनी केले. सहभागी रक्तदात्यांना रेड प्लस ब्लड बँकेच्या वतीने कार्ड देण्यात आले. पिंपरी चिंचवड विद्यापीठाचे कुलपती हर्षवर्धन पाटील, प्र-कुलगुरू डॉ. सुदीप थेपडे आणि पीसीईटी अध्यक्ष ज्ञानेश्वर लांडगे, उपाध्यक्षा पद्माताई भोसले, सचिव विठ्ठल काळभोर, खजिनदार शांताराम गराडे, उद्योजक नरेंद्र लांडगे, अजिंक्य काळभोर, कार्यकारी संचालक डॉ. गिरीश देसाई यांनी रक्तदात्यांचे अभिनंदन केले.

# चिखलीत कबड्डी निवड चाचणी स्पर्धेचे उदघाटन

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत



चिखली (प्रतिनिधी ) ओम साई कबड्डी संघाच्या वतीने पुणे जिल्हा कबड्डी असोसिएशन अंतर्गत पिं चिं. विभाग वरिष्ठ गट निवड चाचणी स्पर्धेचे चिखली येथे उदघाटन करण्यात आले. यावेळी माजी नगरसेवक संजय नेवाळे, शिक्षण मंडळाचे माजी उप सभापती विष्णू नेवाळे, माजी नगरसेवक गीताराम मोरे, कबड्डी असोसिएशचे सरकार्यवाह दत्ता झिंजुर्डे, कार्यवाह दत्ता कळमकर, सह कार्यवाह दत्ता माने, सदस्य अनिल यादव,दिपक धावडे,राजेंद्र वाबळे, चिखलीचे माजी सरपंच काळुराम यादव, पोलीस पाटील विष्णू मोरे, विकास साने,अमृत सोनवणे, बाळासाहेब मोरे, खंडू मोरे, मुख्य आयोजक राष्ट्रीय कबड्डीपट्टू तथा ओम सई कबड्डी संघाचे अध्यक्ष प्रवीण नेवाळे, संदीप नेवाळे आदी मान्यवर उपस्थित होते. या स्पर्धेत पिंपरी चिंचवड विभागातील 55 मुलांचे तर 13 मुलींचे संघ सहभागी झाले होते.

# शिवसंकुलात रंगला "शिवमल्हार 2025" चा दिमाखदार उद्घाटन सोहळा!

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

पुणे : श्री भैरवनाथ शिक्षण प्रसारक मंडळ लांडेवाडी या शिक्षण संस्थेच्या प्रेक्षागृहामध्ये शिवमल्हार २०२५ चा दिमाखदार उद्‌घाटन सोहळा संपन्न झाला. या सोहळ्यास प्रमुख पाहुणे म्हणून शिरूर-हवेली विधानसभेचे आमदार पै.ज्ञानेश्वर उर्फ माऊली(आबा) कटके, डायनलॉग इंडिया लिमिटेडचे कार्यकारी संचालक अक्षय आढळराव पाटील यांनी उपस्थित राहून मार्गदर्शन केले.

या सोहळ्याचे प्रमुख आकर्षण असलेली सुप्रसिद्ध मराठी गायिका अंशिका चोनकर हिने आपल्या तडफदार आवाजाने मराठमोळ्या गाण्यांवर रसिक श्रोत्यांना मंत्रमुग्ध केले.

संस्थेमध्ये शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षण मिळावे यासाठी येथील शिक्षकवृंद मोठी मेहनत घेत आहेत. प्रत्येक वर्षी या शिक्षण संकुलामध्ये काही ना काही विद्यार्थ्यांना



नवीन देता येईल या संकल्पनेतून इन्फ्रास्ट्रक्चर उभा करण्याचा आपल्या संस्थेचा मानस पूर्ण करीत आलो आहे. याच दृष्टिकोनातून इयत्ता नववी व दहावी करिता स्वतंत्र इमारत संस्थेने यंदाच्या वर्षी उभारली आहे. सर्व शिक्षकांसमवेत मीटिंग घेऊन विद्यार्थी संख्या वाढविण्यापेक्षा दर्जेदार व अत्याधुनिक शिक्षण पध्दतीचा अवलंब करून विद्यार्थी घडवावेत अशी अपेक्षा माझ्या शिक्षकांकडून व्यक्त केली.

माझी नातवंडे मुंबईत इंटरनॅशनल शाळेत शिक्षण घेतात. तेथील शिक्षण पद्धती व इतर सोयी सुविधांची मी माहिती घेत असतो.

तिथल्या शिक्षणातल्या काही चांगल्या गोष्टी आपल्या शाळेत सुरू करण्यासाठी मी व्यक्तिशः लक्ष देऊन धडपड करत असतो. यामागे संस्कारक्षम विद्यार्थ्यांची आत्मविश्वासाने पाऊल टाकणारी कार्यकुशल पिढी घडविणे हाच माझा एकमेव उद्देश असतो, असे प्रतिपादन करून सर्व विद्यार्थ्यांना शुभेच्छा व्यक्त केल्या.

यावेळी न्यू इंग्लिश स्कूल लांडेवाडी शाळेचे विद्यार्थी तसेच डेक्कन मराठा ज्युनिअर कॉलेजचे विद्यार्थी यांनी विविध बहारदार गाण्यांवर नृत्याविष्कार सादर करून सर्वांची मने जिंकली. चालू शैक्षणिक वर्षांमध्ये विविध क्षेत्रात पुण्यपूर्ण कामगिरी करणारे विद्यार्थ्यांचा विविध बक्षिसे देऊन सत्कार करण्यात आला.

# मनपा वतीने राष्ट्रीय मतदार दिनानिमित्त

## अधिकारी-कर्मचा-यांनी घेतली मतदानाची शपथ

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

पिंपरी : "आम्ही, भारताचे नागरिक, लोकशाहीवर निष्ठा ठेवून, याद्वारे प्रतिज्ञा करतो की, आपल्या देशाच्या लोकशाही परंपरांचे जतन करू आणि मुक्त नि:पक्षपाती व शांततापूर्ण वातावरणातील निवडणूकांचे पावित्र्य राखू व प्रत्येक निवडणूकीत निर्भयपणे तसेच धर्म, वंश, जात, समाज, भाषा यांच्या विचारांच्या प्रभावाखाली न येता किंवा कोणत्याही प्रलोभनास बळी न पडता मतदान करू" अशी शपथ अतिरिक्त आयुक्त विजयकुमार खोराटे, चंद्रकांत इंदलकर यांच्या उपस्थितीत महापालिका अधिकारी, कर्मचाऱ्यांनी घेतली. २५ जानेवारी रोजी राष्ट्रीय मतदार दिवस संपुर्ण देशात उत्साहात साजरा केला जातो. महानगरपालिकेच्या वतीने देखील २५ जानेवारी रोजी कार्यालयीन सुट्टी असल्याने शासन निर्णयानुसार पिंपरी येथील मुख्य प्रशासकीय इमारतीत आज राष्ट्रीय मतदार दिवस उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी सह शहर अभियंता बाबासाहेब गलबले, उप आयुक्त अण्णा बोदडे, विशेष अधिकारी किरण गायकवाड, लेखाधिकारी अनिल पासलकर, जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक



यांच्यासह विविध विभागातील कर्मचारी उपस्थित होते. शपथेचे वाचन जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक यांनी केले.

महाराष्ट्र शासन शालेय शिक्षण व क्रीडा विभाग मंत्रालय यांच्या निर्देशानुसार २५ जानेवारी हा दिवस राष्ट्रीय मतदार दिन म्हणून साजरा केला जातो. त्या अनुषंगाने १८ वर्षे पुर्ण झालेल्या नवोदित मतदारांचा मतदार यादीत समावेश करणे व त्यांचा मतदान प्रक्रियेत सहभाग वाढविणे हा या यामागचा मुख्य उद्देश आहे. भारतीय निवडणूक आयोगाची स्थापना २५ जानेवारी १९५० रोजी झाली. यानंतर २६ जानेवारी १९५० पासून देशात संविधानाची अंमलबजावणी सुरू झाली. २५ जानेवारी २०११ रोजी भारताच्या तत्कालीन राष्ट्रपती प्रतिभा पाटील यांच्या विशेष उपस्थितीत पहिला राष्ट्रीय मतदार दिवस साजरा केला गेला. तेव्हापासून दरवर्षी २५ जानेवारी रोजी राष्ट्रीय मतदार दिवस म्हणून साजरा केला जातो.

# स्व.बाळासाहेब ठाकरे यांना अभिवादन

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत



शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या जयंती निमित्त दुर्गादेवी टेकडी ,निगडी प्राधिकरण या ठिकाणी वृक्षारोपण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.या प्रसंगी स्व. बाळासाहेब ठाकरे यांना अभिवादन करण्यात आले.या वेळी शिवसेना मावळ लोकसभा संघटक संजोग वाघेरे ,माजी आमदार जिल्हाप्रमुख गौतम चाबुकस्वार , उपजिल्हाप्रमुख दस्तगीर मणियार, युवा सेना प्रमुख चेतन पवार, शहर उपाध्यक्ष हरीश आबा नखाते, महिला उपशहर संघटिका वैभवी घोडके , चिंचवड विधानसभा संघटक संदीप भालके, आकुर्डी विभाग प्रमुख गोविंदराव शिंदे, निगडी विभाग प्रमुख सतीश मरळ ,युवा सेना उपशहर प्रमुख प्रवीण पाटील ,युवा नेते संतोष सौंदणकर, प्रकाश देशमुख निवास शिंदे जगदीश पाटील कृष्णा माने आदी मान्य उपस्थित होते, वृक्षारोपण कार्यक्रमाचे आयोजन उपशहर प्रमुख युवासेना पिंपरी चिंचवड शहर निखिल उमाकांत दळवी यांनी केले होते.

# पुण्यातील लष्कर भागात भिक्षेकऱ्याची मारहाण करून हत्या

पुणे : लष्कर भागात भिक्षेकऱ्याला मारहाण करुन करुन त्याचा खून करण्यात आल्याची घटना उघडकीस आली. खून झालेल्या भिक्षेकऱ्याची ओळख पटलेली नाही. याप्रकरणी एकाविरुद्ध बंडगार्डन पोलिसांनी गुन्हा दाखल केला. खून झालेल्या भिक्षेकऱ्याचे वय अंदाजे ६० वर्ष आहे. याप्रकरणी एकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, लष्कर भागातील नेहरु मेमाेरिअल हाॅलसमोरील पदपथावर रात्री भिक्षेकरी झोपतात. खून झालेला ६० वर्षीय भिक्षेकरी तेथे झोपायचा. तेथे आणखी एक भिक्षेकरी झोपायचा. गुरुवारी पहाटे दोघांमध्ये वाद झाले. त्यानंतर भिक्षेकऱ्याला लाथाबुक्क्यांनी बेदम मारहाण करण्यात आली. मारहाणीत भिक्षेकरी गंभीर जखमी झाला. सकाळी पदपथावर भिक्षेकरी मृतावस्थेत सापडला. या घटनेची माहिती पोलिसांना कळविण्यात आली. वरिष्ठ पोलीस निरीक्षक रवींद्र गायकवाड यांनी घटनास्थळी भेट दिली. भिक्षेकऱ्याचा खून करुन पसार झालेल्या आरोपीचा शोध घेण्यात येत असून, पोलीस उपनिरीक्षक धीरज गुप्ता तपास करत आहेत.

# म.न.पा .कबड्डी संघ वरीष्ठ महिला स्पर्धेतही सलग दुसऱ्या वर्षी विजयी

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत



पिंपरी : पुणे जिल्हा कबड्डी असोसिएशनच्या मान्यतेने ओम साई कबड्डी संघ टाळगाव चिखली यांच्या सहकार्याने चिखली, पिंपरी येथे दि.२२/१/२०२५ते२३/१/२०२५ दरम्यान पुणे जिल्हा पिंपरी चिंचवड विभाग ७२व्या वरिष्ठ गट महिला निवड झाली चाचणी कबड्डी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. सदर स्पर्धेत पिंपरी चिंचवड मनपाच्या क्रीडा कला विकास प्रकल्प कबड्डी संघाने महेश दादा स्पोर्ट्स भोसरी कबड्डी संघास ३५-२८,अशा७ गुणांच्या फरकाने पराभव करीत विजय संपादन केला.

या विजयाने वरिष्ठ गट महिला निवड चाचणी कबड्डी स्पर्धेतही सलग दुसऱ्या वर्षी विजय मिळविण्याचा बहुमान सदर संघास प्राप्त झाला आहे. याच संघाने कुमारी गट निवड चाचणी जिल्हास्तर कबड्डी स्पर्धेतही सलग दोन वर्षे विजयी होण्याचाही बहुमान मिळवला आहे. विजयाबद्दल आनंद व्यक्त करीत श्री पंकज पाटील उपायुक्त क्रीडा, किशोर ननवरे क्षेत्रीय अधिकारी ग प्रभाग ,अनिताताई केदारी क्रीडा अधिकारी पिंपरी चिंचवड मनपा, ग्यानचंद भाट प्रशासनाधिकारी क्रीडा विभाग, बाबासाहेब राठोड मुख्याध्यापक माध्यमिक विद्यालय थेरगाव यांनी विशेष अभिनंदन केले आहे.

किर्ती कडगंची हिच्या कुशल नेतृत्वाखाली भूमिका गोरे ,रूपाली डोंगरे ,सविता गवई, ,मनिषा राठोड,रेखा राठोड , सिफा वस्ताद, श्रावणी सावंत,पूजा तेलंग,भारती किरवे, दिव्या कांबळे , पायल डाडर या खेळाडूंच्या सांघिक प्रयत्नांने सदर संघास विजय सहजच मिळविता आला. सदर संघास महाराष्ट्र राज्य कबड्डी असोसिएशनचे सरकार्यवाह बाबुरावजी चांदेरे यांचे शुभहस्ते व पुणे जिल्हा असोसिएशनचे कार्याध्यक्ष दत्ता कळमकर , दत्तात्रेय झिंजुर्डे सरकार्यवाह पुणे जिल्हा कबड्डी असोसिएशन, राजेंद्र काळोखे , सूर्यकांत मुटके, दत्ता माने , दीपक धावडे, शेखर रावडे, राजेंद्र पानसरे, अनिल यादव, संदीप नेवाळे सामाजिक कार्यकर्ते, प्रवीण नेवाळे राष्ट्रीय कबड्डी खेळाडू, यांचे उपस्थितीत "विजय चषक "देऊन सन्मानित करण्यात आले.सदर संघास बन्सी आटवे क्रीडा पर्यवेक्षक , सोनाली जाधव राष्ट्रीय खेळाडू यांचे मार्गदर्शन व रोनित आवाड यांचे सहकार्य लाभले आहे.

# दुर्गा ब्रिगेड संघटनेतर्फे महिला भगिनींसाठी विविध उपक्रम

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

दुर्गा ब्रिगेड संघटनेतर्फे महिला भगिनींसाठी चिखली घरकुल येथे भव्य आरोग्य शिबिर, हळदीकुंकू समारंभ आणि वृक्षारोपण समारंभ घेण्यात आला. यावेळी छत्रपती शिवरायांच्या प्रतिमेला इंडस्ट्रीज असोसिएशनचे अध्यक्ष अभय भोर यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून शुभारंभ करण्यात आला. यावेळी दुर्गा ब्रिगेड शहर उपाध्यक्ष सौ. राईसा ताई पठाण यांनी पाहुण्यांचे स्वागत केले तसेच दुर्गा ब्रिगेड संस्थापक अध्यक्ष कु दुर्गा भोर यांच्या हस्ते पाहुण्यांचा सन्मान करण्यात आला.

यावेळी प्रमुख पाहुणे चिखली पोलीस स्टेशनच्या क्महिला पोलीस हवालदार दिपमाला लोहकरे,सहा.पोलीस फौजदार दिनेश ढवळे ,दामिनी पथक महिला पोलीस हवलदार सुजाता शिंदे ,महिला पोलीस अंमलदार अश्विनी सोनवणे महाराष्ट्र पत्रकार संघाचे प्रदेशअध्यक्ष गोविंद वाकडे ,रोझी भानुशाली सी.एम.ओ ,उद्योजक रेवांना शिंदे ,इत्यादी मान्यवर उपस्थित होते. यावेळी आरोग्य शिबिरात विविध रोगांवर तपासण्या करण्यात आल्या स्त्रियांचे सर्व विकार व विविध चिकित्सा करण्यात आल्या तसेच परिसरात मान्यवरांच्या हस्ते वृक्षारोपण समारंभ पार पाडला. यावेळी मान्यवरांनी आपले विचार व्यक्त केले तसेच याप्रसंगी दुर्गा ब्रिगेड चे




महिला भगिनी उपस्थित होत्या रिझवाना शेख , वैभवी आरोळे, रूपाली निकम, अलका निकम, आशा सरोदे, आरती गोखले, रंजनाताई महानवर ,अशा कोळपे ,माही शेख, शकिरा शेख,,खदिर पठाण, राजेंद्र घायतळे , नितीन आरोळे ,इझरायल शेख, यशपाल सरोदे. आरोग्य शिबिर ला मोठ्या संखेने महिला हजर होत्या .